खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरूनगर

ता. खेड, जि.पुणे

## भूगोल विभाग

## निर्माल्य संकलन

हुतात्मा राजगुरू महाविद्यायाच्या भूगोल विभाग व ग्रीन क्लब तर्फे दरवर्षी अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाते. दि.१३/०९/२०२४ रोजी गणेश विसर्जनाच्या निमित्ताने ग्रीन क्लब व्दारे निर्माल्य संकलन आणि व्यवस्थापन या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयच्या विद्यार्थीनी वसतिगृहामध्ये दरवर्षी गणेशोत्सवाच्या काळात गणेश स्थापना केली जाते. त्यानंतर सातव्या दिवशी गणेशाचे विसर्जन केले जाते. दि. १३/०९/२०२४ रोजी विद्यार्थीनी वसतिगृहाचे गणेश विसर्जन होते. गणेश विसर्जनाच्या दिवशी वसतिगृहातील विद्यार्थीनींनी ढोल आणि लेझीम यांच्या सह गणपतीची मिरवणूक काढली. त्यानंतर सिद्धेश्वर मंदिराच्या पश्चिम बाजूस बैलगाडा घाटाजवळ गणेश विसर्जनासाठी. गेले. तेथे गणपतीची आरती करून गणेशाच्या मूर्तीचे विसर्जन केले.

यावेळी ग्रीन क्लबच्या विद्यार्थ्यांनी गणेशाचे सर्व निर्माल्य गोळा केले आणि त्यानंतर त्या निर्माल्यास तेथेच नदीकाठी खड्डा खणून त्याचे कंपोस्ट खत तयार केले. यावेळी विद्यार्थीनी वसतिगृहाच्या व्यवस्थपिका सौ. रत्नमाला पानसरे मॅडम, ग्रीन क्लब समन्वयक डॉ. डी.एम.मसाकड, वसतिगृहातील विद्यार्थीनी आणि ग्रीन क्लबचे विद्यार्थी उपस्थित होते.




गणेश विसर्जन करताना भीमा नदीच्या काठी गणेशाची आरती करताना रत्नमाला पानसरे, वसतिगृह भूगोल विभाग आणि ग्रीन क्लबचे विद्यार्थी.




ग्रीन क्लब आणि भूगोल विभागाचे विद्यार्थी निर्माल्य संकलन करताना




ग्रीन क्लब व भूगोल विभागाचे विद्यार्थी निर्माल्य संकलन करताना




निर्माल्य संकलन करताना ग्रीन क्लब आणि भूगोल विभागाचे विद्यार्थी आणि सोबत डॉ. डी.एम.मारकड

विभाग प्रमुख
भूगोल विभाग
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, (खेड) जि. पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.